प्रकरण २

जगाच्या महाकव्याबदद्ल असे म्हणणे भाग आहे की, ती काव्ये टिकली आहेत. व त्यातील राजकारण, धर्मकारण, समाजकारण, यासारख्या भिन्न भिन्न परिस्थितीत, भिन्न भिन्न परिस्थितीत त्या त्या समाजापुढे उद्‌भवणाऱ्या प्रश्नांच्याच नव्हे तर नित्य व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या नीतीचा बोध, त्यातील वर्णिलेल्या व्यक्तींच्या राग, द्वेष, भावनेपासून दूर जाऊन शाश्वत सुखासाठी केलेल्या कार्याचा पडसाद आपल्या अंतःकरणात उठत असल्याचा प्रत्यय येतो. त्या प्रत्ययात विलक्षण रोमांचकारी आनंद आहे, आणि तो आनंद निर्माण करण्याच्या त्या महाकाव्यांच्या सामर्थ्याला मरण नाही म्हणूनच ती अजरामर झाली आहेत. (१)

ऋषभेदव व भरत चक्रवर्तीच्या वेळचा समाज व सामाजिक संस्थाचा इतिहास दृष्टीस पडतो समाजाची निर्मीतीमानव समूहाचे रक्षण व त्याचे आदर्श निश्चित करण्यासाठी होते. या निर्माण कार्यात मानवी आचार-व्यवहार व मानाचे स्थान प्राप्त करण्याचो प्रवृत्ती ही कारण आहे. (२)

आदिपुराणातील वर्णव्यवस्था - उत्पत्ती - " आदिपुराण " जैन आगमाप्रमाणे भगवान ऋषभनाथाच्या काळात भोगभूमीचा काल संपला व कर्मभुमीला सुरुवात झाली. भोगभुमीत जो जे वांछीत होता तो ते कल्पवृक्षा पासून त्वरीत मिळवत असे. परंतू भोगकाल संपला लोकांच्या दैनंदिन अडचणी घेऊन लोक आदि तीर्थंकर ऋषभनाकडे गेले तेंव्हा ऋषभनाथांनी लोकांना असा उपदेश केला की, कर्मभुमीचा काळ आल्याने अषि, कृषि, मषी, विद्या, वाणिज्य, शिल्प हे षट्कर्म उदरनिर्वाहाची साधने आहेत लोकांना सांगितली. शेती व्यवसाय करुन गाय, म्हैस पालन करुन आदि दुय्यम धंदे करुन जगता येईल असे सांगितले. आतापर्यंत भोगभूमीत व्यक्तिगत जीवन होते. व्यक्तिगत गरजाही नव्हत्या. परंतु जेंव्हा भोगभूमी संपली नंतर व्यक्तीगत गरजा वाढल्या म्हणून सामाजिक जीवनाशिवाय पर्याय उरला नाही सामुदायीक जीवनाने किंवा संघटना करुन सुख व शांतीने जगता येईल हा विचार प्रचलीत झाल. गांव शहरे वसवली गेली.

१. **असि** - लोकांमध्ये जे बलवान शुर वीर असतील, ज्यांना शस्त्राअस्त्रे चालविण्यास येत असतील , जे दर्बलांचे रक्षण करतील, जे समाजाचे रक्षण करण्याचे काम घेतील त्यांना

क्षत्रिय म्हटले जाऊ लागले अर्थात त्यानी असि व्यवसायाचा स्वीकार केला.

२. **मषि** - जी माणसे लिहिण्यावाचण्यात चतुर आहेत. त्यानी विद्येच्या द्वारे उपजिवीका करावी, तयांना मषि म्हटले जाऊ लागले.

३. **कृषि** - अन्न मिळविण्यासाठी जमीन नांगरुन, धान्याची पेरणी करणे हा व्यवसाय किंवा हे कार्य करायला ज्याला अवडेल त्यांनी कृषीजीवी व्हावे.

४. **विद्या** - दिवसभराच्या श्रमाने आलेला थकवा दूर करण्यासाठी गीत, नृत्यादिक कार्यक्रम करतील किंवा जे मनोरंजन करुन उदरनिर्वाह करु इच्छितील त्यांनी विद्याजीवी बनावे.

५. **शिल्प** - शेतीसाठी निरनिराळया हत्यारांची अवश्यकता भासेल, घरे वगैरे बांधण्यासाठी कुशल कारागिरांची अवश्यकता लागेल, म्हणून ज्यांना अशी कामे करण्याची आवड असेल त्यांनी शिल्पजीवी व्हावे.

६. **वाणिज्य** - कृषि, शिल्प वगैरे पासून उत्पन्न झालेल्या वस्तू घेऊन विकण्याचे कार्य करण्याची ज्याना इच्छा असेल त्यांनी वाणिक कृषिशी समरस व्हावे. (४)

ऋषभदेवानी सांगितलेली वरील षट्कर्मे आवडली षट्कर्माप्रमाणे लोक आपपली कामे जीवन जगण्यासाठी करु लागली.

भोगभूमीत सारख्या व्यक्तिमत्वाची लोक होते. एकमेकांच्या सहकाऱ्याची गरज नव्हती. परंतू कर्मभूमीमुळे वेगवेगळया स्वभावाची, विचाराच्या मानवाची निर्मिती झाली. कोणी दूर्बल, कोणी सबल, कोणी परिश्रमी, कोणी कमी परिश्रमी, कोणी बुध्दीमानअशा प्रकारच्या मानवाची निर्मिती होऊ लागली. ऋषभनाथानी लोकांना श्रम करण्याची सवय लावली. गांव, नगरे वसविली. माणसे हळुहळु आपल्या धंद्यात रममाण झाली., तेंव्हा ऋषभदेवानी समाजीची तीन वर्णात विभागणी केली.

हे तीन वर्ण खालील प्रमाणे -

१. क्षत्रिय २. वैश्य ३. क्षुद्र

पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या कालाच्या शेवट पर्यंत लोक सदृश, बुध्दि, बलधारक होते तेंव्हा वर्णाश्रम व्यवस्थेची आवश्यकता नव्हती. तिसऱ्या कालाच्या शेवटी मात्र समाजात विषमता होती म्हणून ऋषनाथ

भगवंतानी क्षत्रियादि तीन वर्णांची निर्मिती केली. पण ब्राम्हण वर्णांचा उल्लेख नाही.

१. " ब्राम्हण" वर्ण का सांगितला नाही ? - कारण भोगभूमीचा काळ नुकताच संपला होता. त्यामुळे खाणे, पिणे, राहाणे याच समस्या होत्या. विद्या व्यासंगाकडे लोकांचे दुर्लक्ष होते म्हणून ज्ञानी वर्गाची निर्मिती झाली नाही.

दुसरे कारण, प्रत्यक माणुस स्वभावतः ज्ञानी, असतो. म्हणजेच ब्राम्हण वर्णाची प्रकृती ही मानवाच्या स्वभावातच होती गरजेतून, कार्यातूनच वर्णाची उत्पत्ती झाली म्हणून उपजीवीकांचे साधन सुरुवातीला बुध्दीजीवी नव्हते. म्हणजेच ब्राम्हणवर्ण आजीवीकांचे साधन मानले नाही. (५)

२. क्षत्रिय - शस्त्र धारण करुन ज्यांनी आपला उदरनिर्वाह चालू केला त्यांना क्षत्रिय

म्हटले गेले.

३. वैश्य - जे शेती, व्यापार, पशुपालन वगैरे द्वारा आपली उपजीवीका करत ते वैश्य नावाने संबोधले जाऊ लागले.

४. शुद्र - श्रमाची कामे करणारा, सर्वांची सेवा करणारा तो शुद्र समजला जाई.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

भरत चक्रवर्तीने ब्राम्हण वर्ण निर्माण केला -

सर्व लोकांना आपआपली कामे करण्याची स्विकृती दिली गेली. याच काळात ऋषभनाथाचे सुपुत्र भरत चक्रवर्तीने विद्येचे दान करण्याला ब्राम्हण म्हटले. क्षत्रिय, वैश्य आणि शुद्रांना या तिन्ही वर्णाला बौध्दिक सामुग्री पुरविणाऱ्याला ब्राम्हण संबोधण्यात आले. (६)

जिनपूजा, उपजीविका, दान, स्वाध्याय, संयम , तप हे षट्कर्मे द्विजाची आहेत. जो या षट्कर्माचे पालन करतो तो ब्राम्हण होय. तसेच तप, श्रुताभ्यास आणि जात हे तीनही ब्राम्हण होण्याची कारणे आहेत. जो मुनष्य तप व श्रुताभ्यासाने रहित आहे तो केवळ जन्माने ब्राम्हण होय.(७)

वर्णोत्पत्ती विषयी हिंदूचे विचार -

समाजातील वर्णव्यवस्था ही प्राचीन भारताची विशेषतः मानली जाते. पुरुषसुक्तात या वर्णाचा उगम कसा झाला याचा उल्लेख येतो. समाज पुरुषांचे चार वर्ण - ब्राम्हण,क्षत्रिय, वैश्य, शुद्र हे चार अवयव होते. ब्राम्हण मुखातून, क्षत्रिय बाहुतून, वैश्य मांडयातून आणि शुद्र पायातून निर्माण झाल्याचा उल्लेख येतो.

ब्राम्हाणोस्य मुखामासीद, बाहु राजन्यः कृतः ।

उरुतदस्य यद् वैश्यः, पद्भ्यां शुद्रो अजायत ।। (८)

समाजातील चार वर्ण पुरुषसुक्तानी 'ऑरगॅनिक थिअरी ऑफ सोसायटीचा पाया घातला' असा उल्लेख येतो. एकाच शरीराचे अवयव म्हटल्यावर त्यात संघर्ष नसतो, तर सामंजस्य व सहकार्य असते. त्याप्रमाणे समाजाच्या या चार वर्णाने वागावे ही अपेक्षा पुरुषसुक्ताने व्यक्त केली आहे. (९)

महाभारतात कर्माप्रमाणे वर्णव्यवस्था निर्माण झाल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. महाभारतातील भारद्वाज भृगु महर्षी यांना असा प्रश्न पडतो की, शित म्हणजे सत्व गुण, लोहित म्हणजे रजो गुण, पित म्हणजे रजतममिश्रित गुण, कृष्ण म्हणजे तमो गुण, असे मानतो, मग काम, क्रोध, लोभ, क्षुधा,भय, शोक, चिंता आपल्या सकळयामध्येच असु शकते. तर मग वर्ण भेद का ? असे विवेचन महाभारतात येते म्हणजेच वर्ण हे कर्माप्रमाणे, कृतीप्रमाणे निर्माण झाले, हे स्पष्ट होते. (१०)

वर्णोत्यवस्थेविषयी - वैदिक धर्मानुसार विचार केल्यास अनेकांचे अनेक मते वाचायला मिळतात.

भृगू महर्षी म्हणतात, या विश्वाची निर्मिती ब्रम्हाने केली. म्हणून पहिला वर्ण ब्राम्हण केला. (११)

वैशम्पायन महर्षी महाभारतात युधिष्ठराला म्हणतात. सत्य शौच, दया शौच, इंद्रियनिग्रह शौच, सर्व प्राणिदया शौच, तपशौच,हे पाच प्रकारचे

शौच असणारा द्विज, पंचलक्षणांनी युक्त असतो त्याला ब्राम्हण म्हटले आहे. (१२)

वर्ण व्यवस्थेविषयी वैदिक, जैन धर्मांनी मान्यता दिली असली तरी त्यामागची पार्श्वभूमी पाहिल्यास त्या वर्णाचे महत्व पटते, पण त्याचे आज विपरीत रुप पहायला मिळते.

व्यक्तीची मुळ आवड आणि पात्रता पाहण्याची आजच्यासारखी तयकाळी मनोवैज्ञानिक पध्दत,यंत्रे नव्हती. कुटुंबातील वातावरण आणि अनुवंशाने मिळालेले गुण या दोन कारणामुळे बापजाद्यांचे व्यवसाय स्विकारले जात व त्यातून जाती व्यवस्था निर्माण झाली, अर्थात जन्माने जाती ठरु लागल्या. पाश्चात्य देशातही 'कास्ट' हा इंग्लीश शब्द त्याकरिता उपलब्ध आहे. पण औद्योगीकरण व शास्त्रीय प्रगती यामुळे ती व्यवस्था कालबाह्य व अनावश्यक ठरली. (१३)

उपनिषदात अथातो ब्रम्ह जिज्ञासा या सुक्तात ब्रम्हाची व्याख्या 'जन्माधस्य यत:' म्हणजे ज्याच्यापासून जगाची उत्पत्ती स्थिती, लय होतात ते ब्रम्ह होय. व या ब्रम्ह शब्दापासूनच जग उत्पत्ती व ब्राम्हणवर्ण उत्पत्ती झाल्याचा उल्लेख येतो. चार वर्णांपैकी म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र " ब्राम्हण" हा वर्ण सोडल्यास बाकीच्या वर्णाची कर्माप्रमाणे निर्मीती झाल्याचे वाचनात येते. मतमतांतरे असतील वर्णव्यवस्था कर्माप्रमाणे असेल किंवा

जन्माप्रमाणे असेल परंतू चतुरवर्ण व्यवस्था भारतीय संस्कृतीच्या पुराणातून ठायी ठायी आढळते.

आदिपुराणातील संस्कारविधी - बालकावर जसे संस्कार करुत्त त्याप्रमाणे जीवन घडत असते. संस्कार हेच जीवनाचे मुळ आहे.

भरत चक्रवर्तीनी उपदेश केल्याप्रमाणे गर्भापासून मोक्षाला जाण्या पर्यंतच्या क्रियाचा उपदेश दिला.

१. गर्भधान संस्कार - पत्नीने ऋतुस्नान केल्यानंतर जिनेन्द्र देवाची पूजा वगैरे पूर्वक गर्भाधान करण्यास,आधन क्रिया म्हणतात याचा उद्देश पुञ उत्तम जातीचा, उत्तम गृहस्थ, मुनीन्द्र पदाचा धारक व्हावा हा होय.

२. प्रीतीसंस्कार - गर्भाधानानंतर तिसऱ्या महिन्यात जिन पुजन करावे घराच्या दरवाजाला तोरण बांधून दरवाजा पुढे दोन कुंभ ठेवावे. याचा उद्देश पुञ त्रैलोक्यनाथ, त्रिकालज्ञानी व्हावा हा उद्देश असतो.

३. **सुप्रीती** - गर्भापासूनच्या पाचव्या महिन्यात पूजाविधी करावी.

४. **धृती** - गर्भवृध्दीसाठी सातव्या महिन्यात हा विधी केला जातो.

५. **मोद** - नवव्या महिन्यात गर्भपुष्ठसाठी हा विधी करतात. त्यावेळी गर्भीणीच्या गर्भाच्या सुरक्षिततेसाठी कंकणसूञ वगैरे बांधले जाते.

६. **पियोद्भव** - प्रसूत झाल्यानंतर पिता आपल्य मुलाला तुला दीर्घायुष्य लाभो । म्हणून आशिर्वाद देतात.

७. **नामकरण** - जन्मदिवसा पासून बारा दिवस झाल्यावर पूजन विधी करुन शुभ नाम ठेवले जाते.

८. **बहिर्यानक्रिया** - दोन, तीन किंवा तीन ,चार महिन्या नंतर बालकाला प्रसूती गृहाच्या बाहेर नेणे शास्त्र संमत मानले जाते.

९. **निषधाक्रिया** - बालक बसण्या योग्य झाल्यानंतर त्याला योग्य आसनावर बसण्याच्या क्रियेला निषधाक्रिया म्हणतात.

१०.**अन्नप्राशन क्रिया** - जन्मापासून सात आठ महिने झाल्यानंतर जिनपूजनादि विधी करुन अन्नप्राशनाची क्रिया केली जाते.

११.**व्युष्टि क्रिया** - बालकास एक वर्ष पूर्ण होताच वाढदिवस साजरा करणे.

१२. **चौल क्रिया** - एखाद्या शुभ दिनी देव गुरुंची पुजा करुन केस किंवा जावळ काढणे याला केशवाप क्रियाही म्हणतात.

१३.**लिपिसंख्यान क्रिया** - पाचव्या वर्षी बालकास अक्षरे व संख्येची माहिती करुन देणारा हा विधी आहे.

१४. **उपनीतीक्रिया** - बालाकाच्या आठव्या वर्षी बालकाकडून प्रथमच जिनपूजन करुन त्यास व्रत देऊन कमरेस मुंजेची दोरी बाधावी. पांढरे शुभ्र धोतर, शुभ्र उपरणे आणि यज्ञोउपवित घालून त्यास भिक्षा भोजन करवावे. तद् नंतर तो ब्रम्हचर्याश्रमात प्रवेश करतो.

आश्रम पद्धती - १. ब्रम्हचर्याश्रम - उपनीती क्रिया झाल्यानंतर ब्रम्हचर्याश्रमात प्रवेश होतो. व विद्याध्ययन करु लागतो. शिक्षण पुर्ण होई पर्यंत तो पान खात नाही. अंजन लावून घेत नाही. केवळ शुध्द पाण्याने दररोज स्नान करतो. जमीनोवर झोपतो. कुणोशीही विशेष सलगी करित नाही. प्रथम त्याला श्रावकाचार शिकवावा. नंतर आध्यात्म शास्त्र शिकवावे. यानंतर त्यास व्याकरण, न्याय, अर्थशास्त्र वगैरेचा अभ्यास करण्यास परवानगी द्यावी. ज्योतिष छंद शिकवून आणि गणित शास्त्राचा अभ्यास द्यावा. (१४)

व्रताचरण क्रिया - शिक्षण पूर्ण होताच व्रताचरणाची क्रिया असते. या वेळी तो शिक्षण घेत असताना घेतलेल्या व्रताचा त्याग करतो. परंतु मद्य, मांस, मधू, पाच उबंराची फळे, हिंसेचा त्याग जीवनभर करण्याचे व्रत तो घेतो. (१५)

गुरुशिष्य संबध - जे गुरु आपल्या शिष्याला समान बनवत नाहीत त्या गुरुच्या विद्येला अर्थ रहात नाही असे म्हणतात. आदिपुराणातील गुरु शिष्य परंपरा फार मोठी आहे. स्वतः आदिपुराचे नायक - ऋषभनाथानी आपल्या सारखेच संस्कार मुलावर घातले अर्थात त्यांच्या मुली आर्यीका झाल्या मुलींनीही संसाराचा त्याग केला होता.

जिनसेनाचार्य स्वतः प्रकांड पंडित असूनही ते आपले गुरु आचार्य विरसेनाविषयी लिहीतात की, कविश्रेष्ठ आहे त्याचा आत्मा पवित्र आहे. त्यांच्या काव्यापुढे वृहस्पतीची वाणीही कमी पडते धवलादि ग्रंथ लिहीणारे आमचे गुरु विरसेनचे चरण कमल नेहमी आमच्या मनरुपी सरोवरात विद्यमान राहो. त्यांचे धवलादी ग्रंथ म्हणजे चंद्राप्रमाणे सर्व लोकांना धवल करणारी त्यांची वाणी आहे. पारमार्थिक वंश संबध असणारे गुरु , शास्त्र आणि शब्दांचे भांडार आहेत.

गुरु-शिष्यांच्या संबधीत विचार केल्यास गुरु बद्दल शिष्यांना आदर होता. जिनसेनाचार्यांनी आपल्या गुरूविषयी पारमार्थिक वंशाचे नाते जोडले. गुरुविषयी केलेली वाखाणणी म्हणजे शिष्याचे श्रेष्ठत्वही स्पष्ट होते.

आचार्य जिनसेनांनी आपल्या गुरुंच्या "जयधवला" "धवला" टिका पूर्ण केल्या त्यांनी 'आदिपुराण', 'पार्श्वभ्युदय' दोन महान ग्रंथ लिहीले. आदिपुराण हा गंथ त्यांचे शिष्य गुणभद्र यानी पूर्ण केला. यावरुन गुरुशिष्याचे नाते कळते. गुणभद्राचार्यांचे शिष्य लोकसेन होते.

"आचार्य देवोभव" या वाचनानुसार आचार्यांचे स्थान देवासमान असल्याचे सहज सिध्द होते प्राचीन काळी गुरुशिष्यांचा संबध अतिशय जवळचा असून शिक्षणासाठी शिष्याला गुरुंच्या गृहीच राहावे लागत असे.

अशी उदाहरणे रामायण, महाभारतातही पहावयास मिळतात जैन आचार्य मात्र शिष्यांच्यासह एके ठिकाणी निवास न करता सतत विहार करित असतात.

"आचार्य" शब्दाचा शब्दार्थ विद्वानांनी "आचारवान" असा दिला आहे जो दुसऱ्याला आचारशील बनवितो, शास्त्रातील योग्य अर्थाचे अनुशीलन करतो, तसेच आचार व शास्त्र यांच्या ज्ञानाद्वारे बुध्दि परिमार्जित करतो तेच आचार्य म्हणविला जातो. (१७)

गृहस्थाश्रम- शिक्षण पूर्ण होताच त्याचा विवाह केला जातो. गृहस्थाश्रमात राहून धर्मसाधना करावयाची, विवाहाची वाग्दान, प्रदान, वरण, पाणि पीडन व सप्तपदी ही विवाहाची पाच अंगे आहेत.

विवाहानंतर मातापित्याबरोबर राहिल्याने तो परतंत्र म्हणविला जातो त्यास स्वतंत्र बनविण्यासाठी वर्णलाभ नावाची क्रिया सांगितली गेली आहे.

१६. **वर्णलाभ क्रिया** - स्वतंत्र घरी राहून जेंव्हा तो स्वतःची उपजीविका करु लागतो त्यास "वर्णलाभ क्रिया" म्हणतात. गृहस्थाश्रमातच तो धर्म, अर्थ, काम हे पुरुषार्थ करतो.

१७. **कुलचर्या** - षटकर्म (जिनपूजा, उपजीविका, दान, स्वाध्याय, संयम, तप) करीत निर्दोष रीतीने उपजीविका करणे यास कुलचर्या म्हणतात.

१८. **(वानप्रस्थाश्रम)प्रशान्ति क्रिया** - सुयोग्य पुत्रावर घराचा सर्व भार सोपवून शान्तिपूर्वक आपले जीवन धर्मकर्मात व्यतीत करतो, तेंव्हा त्यास "प्रशान्ति क्रिया" म्हणतात.

१९. **गृहत्याग क्रिया** - धनाचे तीन भाग करुन एक भाग धर्म कार्यासाठी, दुसरा घरखर्चासाठी, तिसरा भाग ज्येष्ठ पुत्र, मुलांमुलीना द्यावा व घराचा त्याग करावा.

२०. **दिक्षांध क्रिया** - दीक्षा घेतल्यांनतर क्रिया केल्या जातात.

२१. **जिनरुपता क्रिया** - परिग्रहाचा त्याग करुन दिगंबर रुप धारण केल्यास जिनरुपता क्रिया म्हणतात.

संन्यास आश्रम - दीक्षेच्या संबधित असलेल्या क्रियांना दीक्षान्वय क्रिया म्हणतात.

मिथ्यादृष्ठी भव्य जीव सन्मार्ग ग्रहण करण्यास तयार होतो तेंव्हा प्रथम अवतार क्रिया केली जाते.

२२. वृतलाभ क्रिया २३) स्थान लाभ २४) गणग्रह क्रिया

२५. पूजाराध्य क्रिया २६) पुण्ययज्ञ क्रिया २७) दृढचर्या क्रिया

२८. उपयोगीता क्रिया २९) उपनीति ३०) उपासकाध्ययन

16361

वैदिक परंपरेनुसार आश्रम पध्दती -

१. चार आश्रम मानले आहेत -

१. ब्रम्हचर्याश्रम - उपनयन संस्कार झाल्यानंतर मुलांना गुरुगृही शिक्षणासाठी पाठवत गुरु कुलातील नियमाचे तसेच ब्रम्हचर्याचे पालन करावे लागे, आश्रम सोडताना गुरुदक्षिणा द्यावी लागत असे. ज्ञान संपादन करणे हे वर्णाप्रमाणे वेगवेगळे असे.

२. **गृहस्थाश्रम** - गुरुगृही राहून आल्यानंतर, विद्या संपादन केल्यानंतर वंश-सातत्य, प्रभोत्पादन याच्याशी एकनिष्ठ राहून सदाचाराचे अर्थार्जनकरणे, समाजाचा योगक्षेम चालविणे, कुटूंबाचे पोषण करणे. धर्म, अर्थ, काम पुरुषार्थ करणे, मृपितृ ऋण, देव ऋण, ऋषीऋण, समाज ऋण या ऋणातून मुक्त होण्याचे प्रयत्न करावे.

३. **वान प्रस्थाश्रम** - गृहस्थाश्रमाच्या अखेरीस संसार मुलांच्या स्वाधीन करुन वान प्रस्थाश्रम स्विकारावा. या आश्रमात

ऐहिक सुखाला महत्व न देता गरजा कमी कराव्यात, परमेश्वराच्या चिंतनात वेळ घालवावा

४. **संन्यास आश्रम-** हा शेवटचा आश्रम सर्व संग परित्याग करुन या आश्रमात पदार्पण करावे, वृत्तांचे खडतर आचरण करावे, सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य याचे काटेकोरणपण पालन करावे. यामुळे संसारातून मुक्त होऊन मोक्ष प्राप्ती होते.

हीच आश्रम व्यवस्था थोडया फार फरकाने जैन, वैदीक व इतर धर्मात पहायला मिळते.

आदिपुराणातील /शिक्षणपध्दती - भारतात प्राचीन काळापासून ज्ञानाची प्रतिष्ठा सर्वमान्य आहे. मानवी जीवनाची सफलता त्याच्या ज्ञानावरच अवलंबून असते. प्राचीन काळापासून एक अत्यंत सुव्यवस्थित आदर्श शिक्षण पध्दती होती.

प्रथम तीर्थंकर भगवान आदिनाथ यांनी आपल्या ब्राम्ही व सुंदरी या दोन कन्यांना भाषा व गणिताचे शिक्षण दिले तेंव्हापासून स्त्री शिक्षणाला सुरुवात झाली तसेच भरत, बाहुबली मुलांना चौंसष्ट कलांचे संपूर्ण शिक्षण दिले होते. तेंव्हा पासून शिक्षण पध्दतीचा उगम झाला. (१७)

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.



भगवान ऋषभदेव आपल्या दोन्ही राजकन्यास अंकलिपी व अक्षरलिपी सुवर्णफलकावर लिहून दाखवितांना.

शिक्षणाची सुरुवात - भगवान आदिनाथ (ऋषभदेव) यांच्या दोन मुली ब्रम्ही सुंदरी किशोर अवस्थेत असताना ऋषभनाथांनी शिक्षणाचे महत्व त्यांना पटवून दिले. त्या दिसायला अती सुंदर होत्या. सुंदरातल्या सुंदर स्त्रियांनी देखील त्यांचे वर्णन कराव्यात अशा होत्या. एके दिवशी त्या दोघी ऋषभदेवाकडे सिंहासनावर बसले असता त्या आल्या. ऋषभदेवानी त्याना उपदेश केला की, तुमचे सौंदर्य, शील याला विद्येची जोड असावी. तुम्ही विद्याविभुषित झाला तर जन्म सफल होईल, विद्या विभुषित माणसाचा सगळयांकडून सन्मान होतो, विद्या ही सगळयांचे कल्याण करणारी आहे, मनोरथ पूर्ण करणारी आहे. विद्या हीच धर्म, अर्थ, काम यांची परंपरा राखण्याचे काम करते. विद्या बंधू आहे, मित्र आहे, धन आहे. विद्या ग्रहण करण्याची हीच वेळ आहे. ~~दोघांनी~~ दोघींनी उपदेशानंतर सुवर्ण फलकावर अ, आ अक्षरलिपी लिहून १ ते १० अंक लिहून, अक्षर ज्ञानाला व संख्या ज्ञानाला सुरुवात केली. असेही म्हटले जाते की, ऋषभनाथानी उजव्या हातानी अक्षरलिपी व डाव्या हातानी संख्यालिपी लिहीली. नंतर ऋषभनाथाच्या मुखातून "सिध्दं नमः " हे मंगलराचरण म्हटले गेले, त्याचे नांव सिध्दमातृक आहे. हे मंगलचरण स्वर व व्यंजन या दोन्ही सहित आहे. स्वर व व्यंजना शिवाय कोणत्याही भाषेचे लिखाण पूर्ण होत नाही. संयुक्त अक्षरांची उत्पत्ती, ऐवढेच नाही तर उकार, विसर्ग, अनुस्वार हेही दाखवून

दिले. शब्द, अक्षर असणारी लिपी ब्राम्ही या मुलींने धारण केली म्हणून त्याला ब्राम्ही लिपी म्हणतात. सुंदरी या मुलीने १ ते १० अंक क्रमाने शिकून गणित शास्त्र धारण केले. (१८)

ऋषभदेवांनी सर्व प्रथम दोघींना अक्षर व अंक लिपीत तरबेज केले. वाङ्मयाशिवाय कुठलेही शास्त्र किंवा कला असु शकत नाही. दोघीही सरस्वती देवीसारखे शब्द-अर्था सहीत वाङ्मयात निपूण झाल्या. ऋषभदेवांनी स्वतः तयार केलेले शंभरहून अधिक आध्याय असलेले व्याकरण त्यांना शिकवले. एवढेच नाही तर छंदशास्त्रात निपूण केले. शब्दालंकार, अर्थालंकार, रुपक, यमक, उपमा अलंकाराचे ज्ञान देऊन व्याकरण शास्त्रातही तरबेज केले.

मुलीप्रमाणेच भरतादी पुत्रांनाही शिक्षण दिले गेले. ऋषभसेन याला गांधार विद्या, अनन्तविजय पुत्राला चित्रकलेचे ज्ञान सुत्रधार विद्या, घरे बांधण्याची कला शिकवली. बाहुबलीला कामनिती, स्त्रिपुरुषांचे लक्षण , आयुर्वेद, धनुर्वेद, घोडा, हत्तीचे लक्षण जाणण्याचे तंत्र जाणण्याचे तंत्र शिकविले. एवढेच नाही तर रत्न परीक्षा कशी करायची हेही शिकविले.

वरील वर्णनावरुन असे सिध्द होते की, भारत देशात प्राचीन काळापासून एक अत्यंत आदर्श पध्दती शिक्षण पध्दतीत दिसून येते.

शिक्षणाची उद्दिष्टे -

१. सदाचाराची वृध्दी करणे.

२. व्यक्तिमत्वाचा विकास करणे.

३. प्राचीन संस्कृतीचे रक्षण करणे.

४. सामाजिक व धार्मिक कर्तव्याचे शिक्षण देणे.

शिक्षण काळातील टप्पे -

उपनिती किंवा उपनयन संस्कारानंतर विद्यार्थी जीवन सुरु होते. उपनयन याचा अर्थ कलाग्रहण असा केला आहे. कला म्हणजे विद्या . उपनयन संस्कारानंतर आई-वडील मुलाला गुरुगृही पाठवत उपनयन संस्कार आठव्या वर्षी केला जात असे गुरुगृही बहात्तरच्या कलांचा किंवा काही आवश्यक कलांचा अभ्यास पूर्ण होई पर्यंत राहात असे.

अंगशास्त्रात बहात्तर कलांचे वर्णन आहे. बहात्तर कलांचे तेरा भागात वर्णन येते.

१) पठण २) काव्य ३) मूर्तिनिर्माण ४) संगीत विज्ञान कला

५) मृतिका विज्ञान कला (दगड + माती) ६) द्युतक्रीडा ७) स्वास्थ्य, शृंगार, भोजन विज्ञान कला ८) चिन्ह विज्ञान (स्त्रि-पुरष, प्राणी यांच्यातला फरक चिन्हानी दाखवत) ९) शकुन विज्ञान (पक्षांची भाषा) १०) खगोल विद्या ११) रसायन शास्त्र १२) गृहविज्ञान

१३) युध्द विज्ञान [१९]

आदिपुराणातील गाव नगर रचना -

ऋषभनाथाच्या काळातील नगररचना, गृह रचनेचा थोडक्यात विचार केल्यासही त्यातील विशेष वैशिष्टये दिसून येते.

ऋषभनाथाच्या काळातच नगर, गांव, खेडी आदिंची रचना केली गेली. सागरापर्यंत लांबवर पसरलेल्या पृथ्वीचा राज्यकारभार पहाण्यासाठी

राज्यव्यवस्थेसाठी छोटया राज्यात विभाजन केले. सुकुशल, सुकोशल, अवन्ती, पुण्ड, उण्ड, अश्मक, रम्यक, कुरु, जांगल, करहाट, महाराष्ट्र, सुराष्ट्र, आभीर, कोंकण, बनवास, आन्ध्र, कर्णाट कोशल, चोल, केरल, दोरु, अभिसार, सौवीर, शूरसेन, अपरान्तक, विदेह सिन्धू, गांधार, यवन, चेदि, पल्लव, काम्बोज, आरट्ट, बाहुकि, तुरुष्क, शक और केकय या देशांची रचना केली होती. या शिवाय अनेक राज्यांची स्थापना केली होती. (२०)

नदी , ओढे, सरोवरांची विपुलता होती. हि नगरे, खेडी अशी शोभायमान दिसत होती की, जणू काही स्वर्गाचे तुकडेच पृथ्वीतलावर अवतरली होती. इंद्राच्या कृपेने अदेवमातृक म्हणजे नदी, नाल्यांचे पाणी व देव मातृक म्हणजे नैसर्गिक पाऊस . पाण्याची किती तरी विपुलता होती. विजयार्ध पर्वतापासून समुद्रापर्यंत किती तरी देशांची रचना केली होती. सगळीकडे या देशाच्या सिमेच्या रक्षणांसाठी अन्तपाल, रक्षकतट उभे केले होते. देशाच्या मध्यभागी कोट, प्राकार, परिखा, गोपूर आणि अटारीने युक्त राजधानी सुशोभित केली होती. राजधानीत राजघराण्यांतील लोक रहात होते. जे ठिकाण बाग, तलावाने युक्त होते तिथे शुद्र, शेतकरी रहात होते, त्याठिकाणाला "ग्राम " किंवा गांव म्हणत. ज्या परिसरात शंभर घरे त्या ठिकाणाला लहान गांव संबोधत, ज्या परिसरात पाचशे घरे असत त्याला मोठे गांव संबोधत. छोटया गावाचा परिसर दोन कोसाचा असे अशा गांवाच्या शेतातून साळीचे पीक घेतले जाई. नदी, पहाड,गुफा, स्मशान व बाभुळ इत्यादि काटेरी वृक्ष गावाची सिमा चिन्हे दाखवीत होती. गावात राहणाऱ्या व उपभोग घेणाऱ्यांसाठी योग्य नियम बनविले होते. अपराधी लोंकाना दंड केला जात होता. (२१)

ज्या परिसरात बाग, बगीचे, तलाव असत ती चांगल्या ठिकाणाची वस्ती होती, त्याला नगर म्हणत. नगर, पर्वत नदीने घेरलेले होते त्याला "खेट" म्हणत परंतू जे नगर पर्वताच्या रांगाने घेरले होते त्याला "खरवट" म्हटले जात. जे पाचशे गांवानी घेरलेले आहे त्याला "मडम्ब" म्हणत समुद्र किनाऱ्यावरील भागांना "पत्तन" म्हणत. नदी किनाऱ्यावरील भागांना "द्रोणमुख" म्हणत. एका राजधानीत आठशे गांव असत. एक द्रोणमुखांत चारशे गावे असत, एका खरवट भागात दोनशे गांवे असत अशा रितीने नगर , गावांची रचना केली होती. (२२)

दागदागिने अलंकार - आदिपुराणात वर्णिल्या प्रमाणे त्यावेळच्या राजकुमाराचे शरीर एवढे शोभायमान, कांतीमान होते की, त्यांना अन्य दागदागिने परिधान करुन शोभा वाढविण्याची गरज नव्हती, तरी देखील राजकुमारांनी अंगावर घातलेल्या दागिन्यांची नावे यष्ठी, हार व रत्नावली इत्यादि असून ही दागिने मोती व रत्नापासून बनविले असून त्यातील यष्टी नावाचे आभूषण शीर्षक, उपशीर्षक, अवघाटक, प्रकाण्डक आणि तरल प्रबन्धन अशी पाच प्रकारचे होते. जी यष्टी सुवर्णमणी, माणिक्य व मोती यामध्ये थोडे अंतर ठेऊन गुंफलेली असेल तर त्याला "अपवर्तिका " असे म्हणत.ज्याच्या मध्यभागी मोठा मोती लावलेला होता. त्याला "शीर्षक यष्टी " म्हणत. ज्या हारामध्ये क्रमाक्रमाने वाढवत मोती लावलेले होते त्याला " उपशीर्षक " म्हणत. ज्यामध्ये वाढवत पाच मोती लावलेले होते त्याला " प्रकाण्डक "म्हणत. ज्यामध्ये एकसमान मोती लावलेले होते त्या माळेला " तरलप्रतिबन्ध " म्हणत. ज्यामध्ये एक मोठा मणी व त्याच्या दोन्ही बाजून क्रमाक्रमाने घटत जाणारे मोती लावलेले असत त्याला "अवघाटक "म्हणत.

हिरे माणिकाच्या लडिने बनविलेल्या माळेला " हार " म्हणत. ज्या माळेत एक हजार आठ लडी असत त्याला " इन्द्रछन्द " हार संबोधत.

ज्याच्यात चौंसष्ठ लडी असत त्याला "अर्धहार " म्हणत. ज्यात चौपन्न लडि असत त्याला " रश्मिकलाप" म्हणत. ज्यात बत्तीस लडि असत त्याला " गुच्छ " म्हणत. ज्या माळेत सत्तावीस लडि असत त्याला " नक्षत्रमाला " म्हणत असे विविध दागिने परिधान करुन वज्रजंघ आणि श्रीमती यांच्या विवाह सोहळयाला लोक आले होते. (२३)

विवाह सोहळा- वज्रजंघ व श्रीमती यांच्या विवाह सोहळयाचे वर्णन ऐकताच तत्कालीन वैभवाची कल्पना येते. चक्रवर्तीच्या आज्ञेने विश्वकर्म नावाच्य माणसाने रत्नांचा विवाह मंडप तयार केला. विवाह मंडपाचे खांब सोन्याचे होते. मंडपाचे प्रतिबिंब स्फटिकांवर दिसत होते. या मंडपाचा परिसर नील रत्नांनी बनविला होता. त्यावर अधून मधून फुलांची उधळणं केली होती. भूमिवरचाच परिसर पण आकाश व आकाशातील तारका सारखा,सुशोभित दिसत होता. या मंडपात मध्यभागी पद्मराग मण्यानी मोठी वेदी तयार केली होती. मंडपात जाण्याचा दरवाजा अनेक रत्नांनी मडविला होता. ज्योतिषांनी सांगितलेल्या शुभ दिवसी लग्न चंद्रमा आणि ताऱ्यांच्या बलावर निघालेले विवाह मुहूर्त जवळ आल्याचे सुचित केले. त्यादिवशी नगर सुध्दा सुशोभित केले होते. चारी दिशेला तोरणे लटकत होती. राजभवनाच्या परिसरात चंदन, अत्तराचा शिडकावा केला होता. प्रथम वधू -वरांचा रत्नजडित सुवर्ण कलशातील पवित्र जलाने,ज्यांना विधी माहित आहे, त्यांनी अभिषेक केला. अभिषेका वेळी शंखादी वाद्यातून कलरव होत होता. विवाह प्रसंगी सर्व लोक हर्ष मोहित झाले होते. सर्वांनी फुले व अक्षता टाकून त्यांचे भले चिंतीले.(२४)

आदिपुराणातील समाजव्यवस्थेत महिलांचे स्थान - मानव जातीतील समाज रचनेत स्त्री -पुरुषाला समान स्थान आहे. स्त्री-पुरुष

विश्वरथाची दोन चाके असल्याने विश्वरचनेत स्त्रीचे स्थान पुरुषाप्रमाणेच सहज, स्वाभाविक, अनिवार्य व अभिन्न राहिले आहे.

भगवान आदिनांथानी पुत्राबरोबरोने आपल्या दोन्ही मुलींना सर्व प्रकारचे शिक्षण देऊन सुसंस्कृत केले होते. आदिनांथानी स्त्रीला दिलेल्या सामाजिक आध्यात्मिक क्षेत्रातील स्थान व अधिकारांमुळे भारतीय संस्कृतीचा प्रारंभ काळ स्त्रिच्या दृष्टीने उज्वल होता. आपल्या बौध्दिक विकासाला व त्यामुळे शक्य असलेल्या आत्मिक उन्नतीला त्यांना भरपूर वाव मिळालेला दिसतो. ऋषभदेवांनी आपल्या ब्राम्ही ,सुंदरी मुलींना शिक्षणांसाठी प्रेरीत करतांना म्हटले.

"विद्यावान पुरुषोलोके सन्मति यति कोविदै: ।

नारीच तद्वती धत्ते स्त्रीसृष्टेरग्रिम पद्म [२५]

(आदि पुराण १६ पर्व श्लोक ९८)

ब्राम्ही व सुंदरी या कन्यानी अंक विद्या व अक्षरविद्या या विषयात प्राविण्य संपादन केले होते. धीरगंभीर , प्रेमळ पित्याच्या थोर व्यक्तीमत्वाचा ठसा त्यांच्या मनावर अधिक खोलवर उमटला होता. इंद्रियजन्य सुखापेक्षा बुध्दिजन्य आनंदाची त्याना अधिक रुची होती त्या साहित्य तत्वज्ञानावर चर्चा करत. बागेत बसून विणा घेऊन गात असत.

आदिनाथ भगवंताच्या चतुर्विध संघात दोघी बहिणी होत्या. कन्येला पैतृक संपत्तीत भाग होताच. त्या पित्याच्या संपत्तीतून दानादिक कर्मेही करत असत. (आदिपर्व ४३ श्लोक १७४,१७५) मध्ये सांगितले आहे की, सुलोचनेने प्रतिमेची प्राण प्रतिष्ठा करण्यासाठी मोठया प्रमाणात पूजाभिषेक केला. आदिपुराणातील सातव्या पर्वात वज्रदंत आपल्या कन्येबरोबर विविध कला प्रकारावर चर्चा करीत असल्याची माहिती मिळते. स्त्रीयावरही गर्भाधनापासून ते लिपीसंख्यान पर्यंतचे संस्कार केले जात होते.

इ.स. ४ थ्या शतका पासून इ.स. १६ व्या शतका पर्यंत गंगवंशात अदभूत कार्य करणाऱ्या व असमान्य कर्तृत्व असलेल्या वीरांगना स्त्रिया असल्याचा उल्लेख मिळतो. राज्य कारभारा बरोबरच मंदीरे,तलाव बांधणे, देखभाल करणे अशा विविध प्रकारचे कार्य त्या करीत असत. खारवेल राजा विरुध्द वजिरी देशाच्या क्षत्रिय राजाची कन्या अर्धांगी हिने स्वतंत्र सेना उभारल्याची माहिती मिळते. (२६)

स्त्रियानी विवाहित असले पाहिजे असा दंडक नव्हता. पती - पत्नीमध्ये संपूर्ण सामजंस्य असावे म्हणून अनुरुप वधुवरांचा विवाह घडवून आणला जाई विवाहामध्ये माता पित्याने आयोजित केलेला विवाह, स्वयंवर विवाह, गांधर्व विवाह इत्यादि विवाहाचे प्रकार तत्कालीन अस्तित्वात असल्याचे दिसते. सामान्यतः समाजात त्याकाळी एक पत्नीत्वाची पध्दत होती. क्वचित प्रसंगी राजे लोक बहुपत्नीत्व विवाह करीत. विवाहाला दैव किंवा धार्मिक बंधन मानले जाई. मथुरेची राजकन्या राजुलमती, श्रीकृष्णाचे बंधू नेमीनाथ यांच्याबरोबर ठरला होता. ऐन पाणी ग्रहणाच्या वेळी मेजवाणीच्या वेळी कोंडून ठेवलेला प्राण्यांचा आर्त स्वर ऐकून नेमीनाथांना उपरती झाली. परंतू राजूलमतीने तद्नंतर दुसऱ्याशी विवाह म्हणजे व्याभिचार समजून दुसऱ्यांदा विवाह केला नाही. उलट आर्यीकेची दिक्षा घेऊन पती मार्ग स्विकारला त्याकाळी विावाह विधीवत होत असत. उदा. मैनासुंदरी महेंद्रपुरची कन्या व पवन कुमाराची पत्नी अंजना सुंदरी हिच्या पती निष्ठे बद्दल वर्णन करावे तेवढे थोडेच आहे. शिवाय सीतादेवीचे उदाहरण आदर्श आहे.

रावणाच्या सहवासात सहा महिने असूनही तिचे पावित्र्य ढळले नाही. तिने अग्निदिव्यही केले. वनवास पत्करुन्ही पतीव्रतेच्या तत्वास बाधा येऊ दिली नाही. स्त्रि ही माता होऊनही पुत्रालाव पुत्रीला जन्म देते म्हणून

तिला पुरुषा पेक्षा अद्वितीय म्हणावे लागेल अशा अनेक स्त्रियांचे उदाहरण देता येईल.

अलिकडच्या काळातील छत्रपती शिवाजी, नेपोलियन , बोनापार्ट यांना जन्म देणारी स्त्री श्रेष्ठ आहे. श्रीरामांनी आपल्या वनवासास माता कैकयी किंवा पिता दशरथ यांना दोष दिला नाही. क्षात्रवृत्ती ही कृतीने पुरुषात असावी, बौध्दिक दृष्टया स्त्रियात असावी असे प्राचीन काळापासून आज पर्यंत दिसून येते. छत्रपती शिवबा शौर्याचे प्रतीक तर जिजाऊ बौध्दिकतेचे प्रतिक आहे. झाशीची राणी परिस्थितीने क्षात्र धर्मात ओढली गेली. स्त्रीने प्रामुख्याने बौध्दिक क्षात्र धर्माचा पाठपुरावा करुन समाज हित व आपले कौटुंबिक हित साधावयास भारतीय संस्कृती सांगते. (२७)

जैन नीतीप्रमाणे उच्च वर्णातील पुरुष, नीच वर्णातील स्त्री बरोबर विवाह करु शकतो. उच्च वर्णाच्या स्त्री बरोबर नाही. ब्राम्हण चार वर्णाच्या, क्षत्रिय तीन वर्णाच्या, वैश्य दोन वर्णाच्या, शूद्र एक वर्णाच्या स्त्रीशी विवाह करु शकतात. विवाहाचे अनेक प्रकार असून त्यापैकी ब्राम्ह विवाह, दैव विवाह, आर्यविवाह, प्राजापात्यविवाह हे धर्म मान्य व असुरविवाह, गंधर्वविवाह व पिशाच्च विवाह हे अधर्म विवाह प्रकार समजले जात. विवाहात वाग्दान, प्रदान, वरण, पाणिग्रहण, सप्तपदी या विधी महत्वाच्या मानल्या होत्या.

सभा मंडपात नृत्य परायण निलांजना हिला नृत्य करित असतांनाच मृत्यू आला. याचा परिणाम ऋषभनाथावर झाला त्यांनी संसातून मुक्त होण्याचे ठरविले, विरक्त होऊन मुनी दिक्षा घेतली व कडक तपश्चरण करुन केवलज्ञान प्राप्त केले. केवलज्ञान झाल्यावर सर्व जिवांना उपदेश करण्यासाठी निघाले ठिकठिकाणी मोठया सभा होत. या महासभेलाच

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.



भगवान ऋषभदेव समवसरणात (महासभेत) विराजमान आहेत.

"समवशरण" म्हणत समवशरण हे त्या काळातील वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे.

भगवंताचा उपदेश ऐकण्यासाठी समवशरण रचना केली गेली. कुशल शिल्पकारांनी भव व सुंदर अशा महासभेचे आयोजन केले होते. बारा योजन विस्ताराचा त्याचा तळभाग दैदीप्यमान होता. इंद्रनिल मन्यानी तयार केलेला विशाल वर्तुळाकार रचना होती. तिच्या बाहेरच्या भागात धुलीसाल नावाचे गोल आवर (तट) होते. त्याच्या बाहेरील चारी दिशास चार तोरण द्वार होती. धुलीसालाच्या आत थोडया अंतरावर बाजूला मधोमध चार मानस स्तंभ होते. ते पाहताच जीवाचा अहंकार नष्ट होत असे.

चार मानस्तंभ, चार दिशेचे प्रतिक, त्याच्या चारी बाजूस सरोवर व बागा होत्या, त्यांनतर एका नंतर एक असे तीन तट होते, तिसऱ्या तटाच्या आत एक भव्य मंडप होता, त्यामंडपाच्या मध्यभागी एक पीठीका होती. त्यावर एक पीठ होते. त्यावर आणखी एक पीठ होते, आणि त्यावर गंधकुटी होती, त्या गंध कुटीत सिंहासना पासून चार अंगुले वर अन्तरिक्षात पद्मासन भगवान विराजमान झालेले होते. चारी बाजूस प्रदक्षीणेच्या स्वरुपात बारा सभा होत्या. त्यात क्रंमाने गणधर, वगैरे मुनीगण, कल्पवासी ,दिवांगणा , आर्यीकासहीत मानव स्त्रिया, ज्योतिर्देवांगना, व्यंतरदेवीगण, भवनवासी देवागंणा, भवनवासी देव, व्यंतरदेव, ज्योतिषदेव कल्पवासी देव, मनुष्य आणि पशु बसले होते.

वरील वर्णनावरुन समवशरणाची रचना तर केलीच पण त्याचे सौंदर्य, कल्पकता, कला चातुर्य, दिसून येते.[२८]

संगीत नृत्य कला - युगादिपुरुष ऋषभदेवांनी संगीत विद्येचा आविष्कार केला होता. ते स्वतः शिक्षक व पुरस्कर्तेही होते. आसे आचार्य जिनसेन म्हणतात.

संगीता बरोबर नृत्यकला, वाद्यकलाची माहिती होते. निलांजना नर्तिका हिचा उल्लेख आदिपुराणात येतो तर ब्राम्ही व सुंदरी या ऋषभनाथाच्या मुली विद्या, तत्वज्ञाना बरोबर बागेत जाऊन विणा हातात घेऊन गात असल्याचा उल्लेख मिळतो. (२९)

आदिपुराणातील आर्युवेद व शरीर शास्त्र नाना प्रकारची विघ्नें निर्माण करणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव झाला. तेंव्हा भरत चक्रवर्ती ऋषभनाथाकडे गेले. आरोग्य रक्षणाचे उपाय त्यांनी विचारले त्यावेळी ऋषभनांथानी पुरुषांची लक्षणे, शरीरा शरीरातील फरक, दोषोत्पत्ती, चिकित्सा व काळ भेद इत्यादि विस्ताराने विवेचन केले. हाच आयुर्वेद शास्त्राचा आरंभ होय. (३०)

भगवान आदिनाथांनी पुरुषांची लक्षणे, दोषोत्पत्ती, चिकित्सा इत्यादिचे वर्णन केले त्याच्या आधारावर जैनाचार्यांनी आयुर्वेद ग्रंथाची रचना केली. व्याम, दर्शन इत्यादिवर प्रकाश टाकला.

आठव्या शतकाच्या सुमारास उग्रादित्याचार्य यांनी आयुर्वेदावर ग्रंथ लिहीला. पूज्यपाद यांनी 'शालाक्यतंत्र' ग्रंथ लिहीला. संमत भद्रांनी तिसऱ्या शतकात रत्नत्रयौषधाचा उल्लेख केला आहे. सामान्य वैद्य वज्रादि तीन रत्ना द्वारे बनविलेले औषध किंवा भस्म असा अर्थ लावणे शक्य आहे. पण ते चूक होय. जैन सिध्दांत सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान, सम्यक चारित्र्य याला रत्नत्रय म्हणतात. हि तीन रत्ने मिथ्या दर्शन , मिथ्या चारित्र्य रुपी त्री

दोषांचा नाश करतात. म्हणून त्याचे नांव 'रत्नत्रयौषध' असे आहे. याशिवाय शालाष्टा तंत्र पुस्तकात ऑपरेशनचे विधान आहे.

प्रसिध्द आचार्य जिनसेनानी विष व उग्र ग्रहांच्या शमन विधीचे निरुपण केले आहे. दशरथ गुरु, मेघनाथ सुरींनी "बालरोग" व तत्समबंधी चिकित्सा आपल्या ग्रंथात केली आहे. त्यांनी, सिंहनाद यांनी शरीरबलवर्धक ग्रंथ निर्माण केला. (३१)

जैन धर्म अहिंसा प्रधान धर्म असल्यामुळे, महाव्रत, महाव्रतधारी मुनींनी औषध निर्माण करतांना कोणत्याही प्राण्यांची हिंसा होणार नाही याकडे प्रकर्षाने लक्ष दिले होते. एकेंद्रीय प्राण्यालाही बुध्दी पुरस्सर त्रास दिला जाणार नाही. याची त्यांनी काळजी घेतली. आयुर्वेद ग्रंथानी वनस्पतीना प्रमुख स्थान दिले. पुष्पआयुर्वेदात केवळ पराग रहित फलांना स्थान दिलेले आहे. आठरा हजार जातींच्या फुलांचा उपयोग औषध निर्माण करण्यासाठी केला जात असे. (३२)

भगवान ऋषभनांथाच्या दिव्य ध्वनीतुन निघालेल्या या जैन आयुर्वेद व शरीर शास्त्राची अनेक आचार्यांच्या महान ग्रंथ निर्मीतीमुळे मोठया प्रमाणात प्रगती झालेली होती. भगवान ऋषभदेवांनी अहिंसा, अपरिग्रह, ब्रम्हचर्य, समता,विश्वबंधूत्व, मानवता सर्व जीव समान आहेत. ही तत्वे सांगितली. त्यांची प्रचिती, अनुभूती, महती आजच्या वैज्ञानिक युगात मानवाला प्रकर्षाने जाणवू लागली आहे. जगाला भेडसावणारे वर्ग कलह, रक्तपिपासा, हिंसाचार, उपासमार, अशांतता, व युध्द हे जटिल प्रश्न सोडविण्यासाठी युवकांनी , राज्यकर्त्यांनी अशा पौराणिक कथा, इतिहास पडताळून पहावा. व त्याप्रमाणे आचरण केले तर जगातील अशांतता दूर होईल.(३३)

प्रकरण २

संदर्भ सुची

१) ना. सी. फडके, साहित्य आणि संसार , मा. ज. पाध्ये, श्री. लक्ष्मीनारायण प्रेस, कोल्हापूर, पृ. क्र. १७

२) पंडिता सुमतीबाई शहा ' पूर्णार्घ्य' , पं. सुमतीबाई शहा व संपादक मंडळ, पूर्णार्घ्य प्रकाशन, सोलापूर पृ. क्र. ३६७

३) आळंदकर ज. ज्ञ. , 'भगवान ऋषभदेव', जैन संस्कृती संरक्षक मंडळ, सोलापूर. पृ. क्र. ७०.

४) कित्ता, 'भगवान ऋषभदेव, पृ. क्र. ७१

५) डॉ. पन्नालाल जैन, 'आदिपुराण', भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, नई दिल्ली. पृ. क्र. ५९

६) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ५३

७) कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. १३८

८) डॉ. देशपांड वि. वा., 'भारतीय तत्वज्ञान ख्रिस्ती विचारावरील प्रभाव', संवाद प्रकाशन, मुंबई,पृ. क्र. ७१

९) कित्ता, 'भारतीय तत्वज्ञान ख्रिस्ती विचारावरील प्रभाव', पृ. क्र. ७३

१०) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ५४

११) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ५४

१२) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ५६

१३) कित्ता, 'भारतीय तत्वज्ञान ख्रिस्ती विचारावरील प्रभाव', पृ. क्र. ७३

१४) कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. १४०

१५) कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. १४३

१६) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. १५४

१७) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ७६५

१८) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ३५५

१९) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. १५४

२०) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ३६९

२१) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ३६०

२२) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ३६१

२३) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ३५१

२४) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. १५८

२५) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ७४१

२६) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ७४३

२७) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ७४५

२८) कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. ९७

२९) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ७९२
३०) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ५०१
३१) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ५०३
३२) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ५०५
३३) कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ६